| | |
|---|---|
| MHAH250001362020 | दाखल दिनांक –१७.०१.२०२०<br>नोंदणी दिनांक –१७.०१.२०२०<br>निकाल दिनांक –१०.०३.२०२६<br>कालावधी –०६ व.०१ म.२४दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पारनेर जि.अहमदनगर येथील न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – एस.आर.कनकदंडे )**

**फौ.कि.अर्ज.२३/२०२०** **निशाणी क्र.१७**

पुष्पा शरद भालेकर,

**वयः**– ४० वर्षे, **धंदाः**– निरंक,

**रा.मु.पो.**म्हसणे, ता.पारनेर, जि. अहमदनगर. **अर्जदार**

**विरुध्द**

शरद दादाभाऊ भालेकर,

**वयः**– ४९ वर्षे, **धंदाः**– शेती,

**रा.**वडनेर हवेली, ता.पारनेर, जि.अहमदनगर. **गैरअर्जदार**

---

**अर्जदारातर्फे विधिज्ञ** : श्री. एस. टी. गुंड
**गैरअर्जदारातर्फे** : एकतर्फा

---

## न्यायनिर्णय

**( दिनांक ९ मार्च २०२६ रोजी पारीत )**

प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२७ अन्वये वाढीव पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**अर्जातील अर्जदाराचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे–**

०२. अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक ०२/०५/१९९९ रोजी हिंदु धर्मशास्त्राप्रमाणे व चालीरितीरिवाजाप्रमाणे झालेला असुन अदयाप तो कायम आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे मौजे वडनेर हवेली, ता.पारनेर येथे नांदण्यास गेल्या होत्या. गैरअर्जदार याने अर्जदार हीस लग्नानंतर सुमारे ७ ते ८ महिने कसेबसे

नांदविले परंतु त्यानंतर गैरअर्जदार यांनी दारु पिऊन पैशाच्या कारणावरुन अर्जदारास मारहाण करण्यास सुरुवात केली. दि.११/१०/२००० रोजी गैरअर्जदार याने दारुच्या नशेत रात्रीचे वेळी अर्जदार हिच्या अंगावर रॉकेल ओतुन तिला पेटवुन देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी अर्जदार हिचे स्वतःचा जीव कसाबसा चालविला. त्यानंतर अर्जदार व तिचे वडिलांनी अनेक प्रयत्न करुनही गैरअर्जदार यांनी अर्जदार हीस नांदविले नाही.

**०३.** गैरअर्जदार अर्जदारास नांदवित नसल्यामुळे अर्जदार हिने गैरअर्जदार विरुध्द पारनेर न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १२५(१) अन्वये अन्नवस्त्र मिळण्यासाठी क्रि.चौ.अर्ज नं.२९५/२००० चा दाखल केलेला होता. सदर अर्जाची गुणदोषावर चौकशी होवुन गैरअर्जदार याने अर्जदार हीस दरमहा रु.५००/- पोटगी द्यावी म्हणुन दि.३०/०९/२००२ रोजी हुकुम झाला आहे. तसेच अर्जदार यांनी गैरअर्जदार याचे विरोधात वाटपासाठी व अन्नवस्त्र पोटगी रक्कम मिळण्यासाठी वेगळा दिवाणी दावा आर.सी.एस. नं.३८७/२०११ दाखल केला होता. त्याचा निकाल होवुन देखील गैरअर्जदार हे कोणतीही अन्नवस्त्राची रक्कम कोर्टात भरत नाही.

**०४.** अर्जदार हीस कोणतेही काम होत नाही. तिला मिळणारी दरमहा पोटगीची रक्कम रुपये ५००/- ही अतिशय कमी असुन त्यामध्ये तिची उपजिवीका होत नाही. अर्जदार हीस आजारपणामुळे सतत औषधोउपचार घ्यावे लागत असुन तिस औषधोउपचारासाठी दरमहा १,५००/- ते २,०००/- रुपये खर्च येतो. अर्जदार हीस तिच्या उपजिवीकेसाठी भाजीपाला व किराणा व इतर जीवनाश्यक गरजांसाठी दरमहा २,०००/- ते ३,०००/- रुपये खर्च येतो. त्याचप्रमाणे अर्जदार हिस

गैरअर्जदारांपासुन राणी उर्फ वैशाली, सागर व शुभांगी अशी अपत्ये झालेली असुन त्यापैकी राणी उर्फ वैशाली व सागर या दोघांचा सांभाळ, पालनपोषण, औषधोउपचार अर्जदार ही स्वतः करत असुन त्याकामी अर्जदार हीस दरमहा ५,०००/– रुपये खर्च येत आहे. अर्जदाराच्या इतर गरजा यासाठी तिला वर्षाला २० ते ३० हजार रुपये खर्च येतो. अर्जदारास गैरअर्जदाराकडून मिळत असलेली दरमहा पोटगी रुपये ५००/– अतिशय तटपुंजी असुन त्या रक्कमेतुन स्वतःची उपजिवीका चालविणे अर्जदारास अशक्य झाल्याने तिच्यावर हातउसने कर्ज देखील झालेले आहे. त्यामुळे सध्याची महागाई व इतर जीवनाश्यक वस्तुंच्या वाढलेल्या किंमती पाहता अर्जदारास गैरअर्जदाराकडून दरमहा रक्कम रुपये ५००/– मिळणारी रक्कम अतिशय कमी आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांची कोणतीही अन्नवस्त्राची सोय करीत नाही. गैरअर्जदार हे अर्जदार यांची कोणतीही अन्नवस्त्राची सोय करत नाही.

**०५.** गैरअर्जदार यास बागायती शेतजमिनी असुन त्या जमिनीतुन कांदा, भुईमुग, ज्वारी, वटाणा अशी पिके दरवर्षाला घेत असुन त्यापासुन त्याला खर्च वजा जाता वर्षाला ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळत आहे. तसेच गैरअर्जदाराला शेतीपासुन चांगल्याप्रकारे उत्पन्न मिळत असुन सध्या शेतीमालाला मिळणारा बाजारभाव देखील अत्यंत चांगला आहे. त्यामुळे गैरअर्जदार हा शेतीमधुन चांगल्याप्रकारे जादा उत्पन्न कमवित आहे. तसेच गैरअर्जदाराकडे ४ ते ५ जर्सी गाया असुन त्यांच्या दुधापासुन गैरअर्जदार यास दरमहा खर्च वजा जाता २० ते ३० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार हिच्याकडे स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्याने व

म्हातारपणामुळे तिला काम करणे अशक्य असल्याने अर्जदारास गैरअर्जदाराकडून क्रि.चौ.अर्ज नं.२९५/२००० मधील दिनांक ३०/०९/२००२ रोजी झालेल्या दरमहा अन्नवस्त्रासाठी रक्कम रुपये ५००/– च्या रक्कमेत बदल होवुन अर्जदारास गैरअर्जदाराकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– पोटगी म्हणुन मिळावेत अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

०६. नोटीस तामील होऊन देखील गैरअर्जदार न्यायालयात हजर झाले नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

०७. अर्जदार नं.१ हिचे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी १०) आणि अर्जदार तर्फे रामचंद्र पठारे साक्षीदार नं.२ चे शपथपत्र (निशाणी ११) दाखल केले आहे. तसेच फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२९५/२००० ची प्रमाणीत नक्कल अभिलेखावर दाखल केली आहे. अर्जदारा तर्फे पुरावा बंदची पुरसिस नि. १४ वर दाखल केली आहे.

०८. गैरअर्जदाराने पुरावा दिलेला नाही. अर्जदाराच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्याकरता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे कारणासंहित निष्कर्ष खालील प्रमाणे दिले आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अर्जदार हे सिध्द करतात का, फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२९५/२००० नुसार मंजुर झालेल्या आदेशा पासुन ते प्रस्तुत अर्ज दाखल करेपर्यंतच्या परिस्थितीमध्ये बदल झाला आहे ? | होकारार्थी |
| **२.** | अर्जदार हे सिध्द करतात का, फौजदारी किरकोळ | |

| | | |
|---|---|---|
| | अर्ज क्र.२९५/२००० नुसार मंजुर झालेली पोटगीची रक्कम अर्जदाराचा उदरनिर्वाह भागविण्याकरीता अपुरी आहे ? | होकारार्थी |
| ३. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून दरमहा १०,०००/- रु. इतकी वाढीव पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ४. | कोणता आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ करीताः-**

**०९.** वरील मुद्दे एकाच घटनेशी संबंधित असल्याने तथ्यांची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर मुद्दयांबाबत एकत्रीत विवेचन करण्यात येत आहे.

**१०.** अर्जदार हिने अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र निशाणी १० वर दाखल केले आहे. अर्जदाराने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रात अर्जातील संपुर्ण मजकुराचा पुनःउच्चार केला आहे. तिच्या शपथपत्रात तिने पुर्वी मंजुर झालेली पोटगीची रक्कम अपुरी पळत असल्याचे स्पष्टपणे नमुद केले आहे. तसेच वैद्यकीय व इतर जिवनावश्यक गरजाकरीता तिला अधिकची रक्कम खर्च करावी लागत असल्याचे कथन केले आहे. अर्जदाराने तिच्या शपथपत्रात तिला कोणतेही स्वतंत्र उत्पन्न नसल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार हा शेती व दुध व्यवसाय करुन चांगले उत्पन्न घेत असल्याचे तिने कथन केले आहे. रामचंद्र पठारे साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.११ वर दाखल करुन अर्जदाराच्या कथनास पुष्ठी दिली आहे. सदर दोन्ही साक्षीदारांचा उलटतपास गैरअर्जदाराने घेतलेला नाही.

**११.** गैरअर्जदार न्यायालयात हजर झाला नाही व जबाब दाखल केला नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराचा उलटतपास देखील घेतला नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा अबाधित राहिला. त्यामुळे अर्जदाराच्या पुराव्यावर अविश्वास दाखविण्यास कोणतेही कारण नाही.

**१२.** अभिलेखावर दाखल फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२९५/२००० च्या निकालाच्या प्रमाणीत प्रतीची अवलोकन केले असता अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नाते संबंध मान्य करुन गैरअर्जदार हा अर्जदारास पोटगी देण्यास बंधनकारक आहे असे यापुर्वीच सिध्द झाले आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जात केवळ पुर्वी मंजुर झालेली पोटगीची रक्कम ही वाढवुन मिळण्यास अर्जदार पात्र आहे की नाही हे ठरवावे लागेल. पुर्वीचा आदेश हा दिनांक ३०/०९/२००२ रोजी पारीत झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा २०२० साली म्हणजेच सदर निकालाच्या १८ वर्षा नंतर दाखल झाल्याचे दिसुन येते. सदर १८ वर्षाच्या काळात निश्चितच महागाई वाढलेली आहे. त्यामुळे अर्जदार कथन करतात त्याप्रमाणे त्यांना मंजुर झालेली ५०० रुपये दरमहा इतकी पोटगीची रक्कम आजच्या काळामध्ये महिन्याचा खर्च भागविण्यास पुरेशी आहे असे म्हणता येणार नाही.

**१३.** अर्जदाराने गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कुठलाही लेखी पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदाराचे उत्पन्न पुर्वीच्या ओदशापासुन निश्चितच वाढलेली आहे किंवा नाही याचा ठोस पुरावा नाही. परंतु ही मानवी वृत्ती आहे की प्रत्येक जण स्वतःचे उत्पन्न वाढत्या खर्चा नुसार वाढवत असतो. तसेच गैरअर्जदाराने

हजर होऊन त्यांच्या उत्पन्नबाबत किंवा अर्जदाराच्या उत्पन्नबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिलेले नाही. त्यामुळे गैरअर्जदार यांचे उत्पन्न काळा नुसार वाढल्याचे गृहीत धरता येईल.

**१४.** अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द वाटपासाठी वेगळा दावा दाखल केल्याचे दिसुन येते. सदर नियमीत दिवाणी दावा क्र.३८७/२०११ व त्यावरील अपील क्र.३१०/२०१७ च्या नकाल्याच्या छायांकित प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत. सदर निकालाचे अवलोकन केले असता अर्जदार ही पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे निष्कर्ष दोन्ही न्यायालयानी नोंदविले आहे. सदर वाटपाच्या निकालानुसार अर्जदार ही गैरअर्जदाराच्या काही मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द झाले असले तरी दैनंदिन खर्चाकरीता गैरअर्जदाराकडून पोटगी मिळण्याचा तिचा अधिकार नष्ट होणार नाही. याउपर अर्जदाराने दुस–या व्यक्ती सोबत विवाह केला असल्याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील पती–पत्नीचे नाते आजतागायत कायम असल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार जिवंत असे पर्यंत तिचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदारावर आहे.

**१५.** अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जाद्वारे दरमहा १० हजार रुपये इतकी वाढीव पोटगी मंजुर करण्याची विनंती केली आहे. परंतु सदर वाढीव पोटगी देण्यास गैरअर्जदार समर्थ आहे किंवा नाही याबाबत कुठलाही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. तसेच अर्जदाराला गैरअर्जदाराच्या मिळकतीमध्ये देखील हिस्सा मिळल्याचे दिसुन येते. त्यामुळे अभिलेखावर दाखल सर्व पुराव्याचा विचार करुन तसेच बदलेल्या परिस्थितीचा

विचार करुन अर्जदार ही रक्कम रुपये १,०००/- इतकी वाढीव पोटगीची रक्कम गैरअर्जदारकडून मिळण्यास पात्र असल्याचे निष्कर्षा पर्यंत मी येत आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ व २ चे उत्तर होकारार्थी तसेच मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष मी अंशतः होकारार्थी नोंदवित आहे. तसेच मुद्दा क्र.४ चे निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराने अर्जदारास दरमहा रुपये १०००/-(रुपये एक हजार) या प्रमाणे अर्ज दाखल तारखेपासून वाढीव पोटगी द्यावी.

३. गैरअर्जदाराने सदर अर्जात किंवा इतर अर्जात अर्जदाराला पोटगीपोटी अदा केलेली रक्कम वरील रक्कमेतून वगळण्यात यावी.

४. गैरअर्जदाराने सदरच्या अर्जाचा खर्च रुपये १०००/- (रुपये एक हजार मात्र) अर्जदाराला द्यावा.

५. सदर निकालाची प्रत अर्जदाराला मोफत देण्यात यावी.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.03.11 12:30:38 +0530

दिनांक- १०.०३.२०२६ (एस.आर.कनकदंडे)

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पारनेर,**

**ता.पारनेर, जि.अहमदनगर.**